ARTHA ( Commercial Weekly ) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No 53.

वर्ष २६ पुणें, बुधवार तारीख ११ मे, १९६० अंक १९

## विविध माहिती

**धान्य सांठविण्यासाठीं गुदामें**—सेंट्रल वेअर हौसिंग कॉर्पोरेशननें धान्य सांठवून ठेवण्यासाठीं आणखी ७ गुदामें बांधलीं आहेत. त्यांपैकीं मद्रास व केरळ राज्यांत प्रत्येकीं दोन आहेत. उत्तर प्रदेश, बिहार व ओरिसा राज्यांत प्रत्येकीं एक आहे. प्रत्येक गुदामांत ५,००० टन अन्नधान्य व्यवस्थितपणें सांठविण्याची सोय केलेली आहे.

**पोलादाच्या कारखान्याचा विस्तार**—म्हैसूर आयर्न अँड स्टील वर्क्स ह्या कारखान्याच्या विस्ताराची योजना आखण्यांत आली आहे. योजनेच्या अंमलबजावणीसाठीं सात कोटी रुपये खर्च येणार असून ह्या कामांत मेसर्स डिमॅग ह्या जर्मन कंपनीचें सहकार्य घेण्यांत येत आहे. म्हैसूर सरकार मध्यवर्ती सरकारकडे आर्थिक साह्य मागत आहे.

**नेपाळ-चीन रस्ता**—चीनचे पंतप्रधान मि. चौ एन् लाय ह्यांनीं खाटमांडू येथें एका स्वागत समारंभांत बोलतांना अशी आशा व्यक्त केली कीं नेपाळ व चीन ह्यांच्यामध्यें थेट रस्ता लवकरच तयार व्हावा. नेपाळ व तिबेट ह्यांमधील व्यापारच नव्हे, तर नेपाळ व चीन ह्यामधील व्यापारहि आणखी वाढविण्याची इच्छा त्यांनीं प्रदर्शित केली.

**चित्रकाराच्या कलाकृतींचें प्रदर्शन**—मि. स्वेस्टोलाव्ह रोरीक ह्या रशिअन चित्रकाराच्या कलाकृतींचें प्रदर्शन मास्को येथें ह्या महिन्याच्या ११ तारखेपासून भरविण्यांत येणार आहे. ह्या चित्रकाराचा जन्म रशिआंत झाला असला तरी तो भारतांतच स्थायिक झालेला होता. प्रदर्शन ४ आठवडे मॉस्कोमध्यें राहिल्यानंतर ते लेनिनग्राड येथें हलविण्यांत येईल.

**बर्मा-शेल कंपनीची देणगी**—बर्मा-शेल कंपनीच्या कलकत्ता येथील शाखेचे मॅनेजर मि. चोप्रा ह्यांनीं कंपनीतर्फे कविवर्य रवींद्रनाथ टागोर ह्यांच्या जन्मशताब्दीनिमित्त रु. ४७,५०० ची देणगी दिली आहे. कंपनीतर्फे टागोर-जयंती फंडाला आणखीहि मदत मिळणार आहे. भारत सरकारनें ह्या देणगीचा स्वीकार केला आहे.

**केबलच्या कारखान्यासाठीं यंत्रसामग्री**—केरळमध्यें काढण्यांत यावयाच्या केबलच्या कारखान्यांसाठीं २२ लाख रुपये किंमतीच्या यंत्रसामग्रीची मागणी एका जपानी कंपनीकडे नोंदविण्यांत येणार आहे. कारखाना उभारण्यासाठीं ४० लाख रुपये भांडवल लागणार आहे. त्यांपैकीं १० लाख रुपये भांडवल केरळ राज्य सरकार घालणार आहे. कारखाना खाजगी मालकीच्या विभागांतील आहे.

**तिसऱ्या वर्गाच्या प्रवाशांची सोय**—दिल्ली ते मद्रास ह्या मार्गावर धांवणाऱ्या जनता एक्स्प्रेसमधील तिसऱ्या वर्गाच्या प्रवाशांना झोपण्याची मोफत सोय लवकरच करण्यांत येणार आहे. ५०० मैलांपेक्षा अधिक प्रवास करणाऱ्या प्रवाशांनाच तिचा फायदा मिळणार आहे. हळुहळु ग्रँड ट्रंक एक्सप्रेस व पंजाब मेल ह्या गाड्यांवरहि अशी सोय करण्यांत येणार आहे.

**विद्यार्थ्यांच्या आरोग्याची चिंता**—नवगुजरात राज्याच्या स्थापनेनिमित्त अहमदाबाद येथें ५०,००० मुलांचा मेळावा भरविण्यांत आला होता. ह्या मेळाव्यांत भाषण करतांना गुजरातचे मुख्य मंत्री श्री. जिवराज मेहता म्हणाले कीं, मुलांच्या आरोग्याची जोपासना करण्यासाठीं शक्य ते सर्व उपाय गुजरातचें सरकार अमलांत आणील.

**समाजविकास योजनांचा आढावा**—समाज-विकास-कार्याचा आढावा घेण्यासाठीं भरविण्यांत येणारी चालू वर्षाची परिषद श्रीनगर येथें जून ६ ते ११ पर्यंत भरणार आहे. देशांतील शेतीचें उत्पादन वाढविण्यासाठीं योजावयाच्या उपायांवर परिषदेंत प्रामुख्यानें चर्चा होणार आहे. त्याचप्रमाणें समाज-विकास, कार्यांत येणाऱ्या व्यावहारिक अडचणींचाहि विचार करण्यांत येणार आहे.

**न्याय व अंमलबजावणी खात्याची फारकत**—ओरिसा राज्यांतील १३ जिल्ह्यांपैकीं ३ जिल्ह्यांत न्याय व अंमलबजावणी खात्यांची फारकत करण्याची योजना सुरू करण्यांत आली आहे. कटक, पुरी आणि बालासारे हे ते जिल्हे होत. सध्यां ही योजना तीन जिल्ह्यांपुरतीच मर्यादित असली तरी कांहीं काळानंतर ती सर्वत्र लागू करण्यांत येणार आहे.

**तिसरा पंचवार्षिक कार्यक्रम**—भारताचा तिसरा पंचवार्षिक कार्यक्रम ह्या महिन्याच्या मध्याच्या सुमाराला तयार होईल, अशी माहिती नियोजन-मंत्री श्री. गुलझारीलाल नंदा ह्यांनीं सांगितली. चीन व भारत ह्यांच्यांतील बिघडलेल्या संबंधांमुळें आर्थिक नियोजनावर परिणाम होण्याची शक्यताहि त्यांनीं ध्वनित केली.

**वीजनिर्मितींत संकल्पित वाढ**—उत्तर-प्रदेशांतील वीजनिर्मितीच्या केंद्रांतून ३०० टक्के अधिक वीज निर्माण करण्याची एक योजना राज्य सरकारनें आंखली आहे. ही योजना तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत पुरी करण्याचा सरकारचा इरादा आहे. विजेच्या संकल्पित उत्पादनवाढीपैकीं २० टक्के वाढ तरी अणुशक्तीवर चालणाऱ्या वीजकेंद्रांतून करण्यांत येईल.

**The Travancore Ogale Glass Manufacturing Company Limited.**

# NOTICE

The Seventeenth Annual General Meeting of the Shareholders of The Travancore Ogale Glass Manufacturing Company Limited will be held at the Registered Office of the Company at the Glass Factory Premises, Manjummel, Alwaye, on Friday, the 3rd June, 1960, at 4 p. m. to transact the following business:

1. To read the Notice and Auditors' Report.
2. To receive and adopt the Directors' Report and audited Balance Sheet and Profit and Loss Account for the year ended 31st December 1959.
3. To sanction the declaration of a dividend.
4. To elect a Director in place of Sri. A. P. Tampi who retires by rotation and is eligible for re-election.
5. To consider and, if deemed fit, to pass the following Special Resolution, with or without modifications, of which special notice under Sections 190, 261 and 281 is received by the Company. " Resolved that Sri Shankar Rao P. Ogale who retires by rotation, and who is a Director of Ogale Brothers (Private) Limited, Managing Agents, and who has attained the age of 65 be re-elected a Director of the Company and that the age limit prescribed under Section 280 of the Companies Act, 1956, shall not apply to him".
6. To appoint auditors for the current year and fix their remuneration.

*By order of the Board*
For OGALE BROTHERS
(Private) Ltd.
Managing Agents

Manjummel, Alwaye,
April 9, 1960.

N. P. OGALE,
Director

(a) A member entitled to attend and vote at the Meeting is entitled to appoint proxy who will attend and vote instead of himself when poll is demanded and the proxy need not be a member.

(b) The Share Transfer Books of the Company will be closed from Monday, the 23rd May to Friday, the 3rd June 1960, both days inclusive.

(c) The dividend, when sanctioned, will be made payable on and after Monday, the 11th July, 1960, to those shareholders whose names stand on the Register on 3rd June, 1960.


**Explanatory Statement as required by Section 173 of the Companies Act, 1956 in respect of item No. 5 above:**

Sri Shankar Rao P Ogale is a Director of Ogale Brothers (Private) Limited, Managing Agents of the Company and attained the age of 65 on 15th July, 1959.

Sri Shankar Rao P. Ogale is actively associated with the Company from its very inception and it is in the interest of the Company that the Board should continue to have the benefit of his long experience in the industry.


किर्लोस्कर
स्थापना १८८८

इलेक्ट्रिक पंपिंग सेट



भारतीय शेतकरी आपल्या शेतीला पाणी पुरवठा करण्या-साठीं किर्लोस्कर पंपिंग सेटची निवड करतांत. कारण ते अधिक काटकसरी, कार्यक्षम व खात्रीलायक आहेत. आपल्या कामीं योग्य आकाराच्या पंपाची निवड करून त्याचा भरपूर मोबदला मिळवा.

किर्लोस्कर ब्रदर्स लि. किर्लोस्करवाडी (द. सातारा)

# अर्थ

बुधवार, ता. ११ मे, १९६०





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## तीन वर्षांत ५,११० कंपन्यांवर खटले

### कंपनी लॉ ॲडमिनिस्ट्रेशनची अधिक अधिकारांची मागणी

१९५६ सालीं कंपनी कायदा अंमलांत आला, तेव्हांपासून सालोसाल कंपन्यांवर कंपनी लॉ ॲडमिनिस्ट्रेशन खात्यानें केलेल्या खटल्यांची संख्या वाढत गेली आहे. १९५६–५७ ते १९५८–५९ ह्या तीन वर्षांत ५,११० कंपन्यांवर खटले भरण्यांत आले; २,१३१ कंपन्यांना शिक्षा झाली आणि फक्त ३७४ खटल्यांत कंपन्या दोषमुक्त ठरल्या. काढून घेतलेल्या किंवा अन्य रीतीनें निकालांत निघालेल्या खटल्यांची संख्या ९६९ होती. ( त्यांपैकी ५६३ खटल्यांचे बाबतींत माफी देण्यांत आली. ) १९५८–५९ अखेर १,६४२ खटले अनिर्णित होते. कंपनी कायद्याच्या अंमलबजावणीची कार्यक्षमता ह्या आंकड्यांवरून सिद्ध होईल.

कंपनी लॉ ॲडमिनिस्ट्रेशननें आपल्या अहवालांत कोर्टांत केलेल्या दंडांचे रकमेबद्दल असमाधान व्यक्त केलें आहे. कांहीं खटल्यांचे बाबतींत फक्त पांच रुपये दंड केल्याचीं उदाहरणें आहेत, तर गेल्या तीन वर्षांतील सर्व खटल्यांच्या दंडांची प्रत्येकी सरासरी रक्कम ९० रुपये भरली. दंडांची सरासरी रक्कम १९५६–५७ मध्यें ५० रु., १९५७–५८ मध्यें ७० रुपये, तर १९५८–५९ मध्यें ११२ रुपये भरली; म्हणजे सालोसाल ती वाढत गेली आहे. वार्षिक साधारण सभा न भरविणें; वार्षिक तक्ते, ताळेबंद, नफातोटापत्रकें दाखल न करणें; लिक्विडेटरांनीं हिशेब न देणें; ही खटल्यांचीं प्रमुख कारणें होतीं. वार्षिक सभा प्रत्यक्ष भरल्याखेरीज ताळेबंद आणि नफातोटापत्रकें दाखल करण्याची जबाबदारी निर्माण होत नाहीं, असें कित्येक कोर्टांनीं मत व्यक्त केलें आहे, त्याचा अहवालांत मुद्दाम उल्लेख करण्यांत आला आहे. दंड फार कमी करण्यांत येतो, कायद्याच्या तरतुदींच्या भंगाचे आर्थिक परिणाम किती भयंकर होऊं शकतात त्याची कोर्टांना जाणीव दिसत नाहीं, अशी ॲडमिनिस्ट्रेशनची तक्रार आहे. दंड जबर ठोठावण्याची आवश्यकता त्यानें सूचित केली आहे.

कंपनी कायद्याच्या भंगाचे हे झाले मामुली प्रकार; कंपन्यांच्या कारभाराच्या चौकशांचे बाबतींत रजिस्ट्रारला अधिक व्यापक अधिकार हवेत, हे मग क्रमप्राप्तच आहे. ह्या चौकशा तांतडीनें आणि यशस्वी रीतीनें करतां याव्यात, अशी मागणी ॲडमिनिस्ट्रेशननें विश्वनाथशास्त्री कमिटीकडे केली; ह्या मागणीपैकी बऱ्याच बाबी कमिटीनें मान्य केल्या; त्यांचा दुरुस्त बिलांत अंतर्भाव करण्यांत आला आहे. त्याअन्वयें रजिस्ट्रारला कंपन्यांचीं हिशेबाचीं पुस्तकें मागवितां येतील व तीं तपासतां येतील. इन्स्पेक्टरांची नेमणूक करण्याबाबत रजिस्ट्रार मध्यवर्ती सरकारला शिफारस करतो, त्या शिफारशीस त्यामुळें बळकटी येईल. कंपन्यांची एकमेकाला कर्जे, गैरकायदा गुंतवणुकी, इत्यादिबाबत प्रकार आज लपून राहूं शकतात. ह्यापुढें, सरकारनें नेमलेले इन्स्पेक्टर कंपन्यांच्या नोकरवर्गाचेहि जबाब घेऊं शकतील; इन्स्पेक्टरांना सर्व कागदपत्रकें उपलब्ध करून देणें कंपन्यांवर बंधनकारक होईल. कांहीं कागदपत्रें नष्ट केले जाण्याचा संभव आहे असें रजिस्ट्रारला वाटल्यास, मॅजिस्ट्रेटचा हुकूम मिळवून तो ते कागदपत्र आपल्या ताब्यांत घेऊं शकेल. चौकशीचें काम विनाव्यत्यय व्हावें, ह्यासाठी सर्व अधिकार सरकारनें स्वतःकडे घेण्याचें ठरविलें आहे.

कांहीं कंपन्यांच्या चौकशांचे वेळीं, कंपन्यांनीं कोर्टामार्फत तहकुबी मिळवून चौकशीचें काम लांबणीवर टाकलें; कंपन्यांच्या व्यवहारपद्धती नीट तपासण्यास सरकारजवळ पुरेसे तज्ज्ञ नोकर नाहींत; ह्याचा राग सरोस सर्व कंपन्यांवर काढणें योग्य दिसत नाहीं. सरकारी अधिकाऱ्यांना भरमसाट अधिकार दिले, तर चांगल्या कंपन्यांचीहि छळणूक होण्याचा संभव आहे. ही गोष्ट लक्षांत ठेवली जाणें अगत्याचें आहे.

तपासणीच्या बाबत कंपनी लॉ ॲडमिनिस्ट्रेशनचा आग्रह प्रत्यक्ष परिस्थितीशीं विसंगत आहे. कसें तें पहा. कंपनी कायदा अंमलांत आल्यापासून मार्च, १९५९ अखेरच्या तीन वर्षांत इन्स्पेक्टरांच्या नेमणुकीचीं ८४ प्रकरणें निर्माण झालीं; १९५६–५७ मध्यें ४७, तर १९५८–५९ मध्यें फक्त १७. तीन वर्षांत मिळून प्रत्यक्ष १४ प्रकरणांत इन्स्पेक्टर नेमण्यांत आले; ६५ प्रकरणांत त्यांची आवश्यकता नाहीं, असेंच ठरलें. तीन वर्षांत इन्स्पेक्टरांनीं एकूण २५ रिपोर्ट केले; त्यापैकी १२ प्रकरणांत फिर्यादीचा प्रश्न आला नाहीं. ६ प्रकरणांत फिर्यादी करण्यांत आल्या. ह्यावरून दिसून येतें कीं, सध्यांच्या परिस्थितींतहि कायद्याच्या तरतुदी भरपूर आहेत; कंपन्यांचा कारभार सुधारत आहेत; आणि कांहीं थोड्या प्रकरणांतील अनुभवावरून सर्वच कंपन्यांवर राग काढणें इष्ट ठरणार नाहीं.

---

**समाजवाद व भ्रष्टाचार**—सी. राजगोपालाचारी ह्यांनीं मद्रास येथें जाहीर सभेंत बोलतांना असें सांगितलें कीं सरकारच्या समाजवादी धोरणामुळें लोकांवर फार नियंत्रणें घातलीं जातात. त्यामुळें सर्व गोष्टींसाठी सरकारकडे पाहण्याची लोकांची वृत्ति होते. अर्थातच भ्रष्टाचार जास्त वाढतो. कारण, धंदेवाल्यांचे व सरकारी नोकरांचे अधिकाधिक संबंध येतात.

**पोलंडचें व्यापारीमंडळ**—पोलंड व भारत ह्यांच्या दरम्यान व्यापारी करार घडवून आणण्यासाठी पोलंडमधील एक व्यापारी-मंडळ भारतांत आलें आहे. पोलंडनें भारताला १५ कोटी रुपयांचें कर्ज दिलेलें आहे. ह्या कर्जाचा उपयोग करून भारत पोलंडकडून भांडवली मालाची खरेदी करणार आहे.

**जम्मू भागांत कोळशाची खाण**—जम्मूपासून ४० मैलांवर असलेल्या एका ठिकाणीं चांगल्या प्रतीच्या कोळशाची मोठी खाण सांपडल्याची वार्ता आहे. ह्या भागांत सांपडलेल्या कोळशाचे कांहीं नमुने एका रासायनिक संशोधन संस्थेंत तपासणीसाठी पाठविण्यांत आले आहेत. संशोधन संस्थेच्या अहवालावर पुढील धोरण अवलंबून राहील.

## आर्थिक प्रगतीसाठी भारताची धडपड

अमेरिकन सोसायटी ऑफ न्यूजपेपर एडिटर्स ह्या संघटनेपुढें बोलतांना अमेरिकेचे भारतामधील वकील मि. एल्सवर्थ बंकर ह्यांनीं आर्थिक विकासासाठी भारत करीत असलेल्या प्रयत्नाबद्दल महत्त्वाचे विचार व्यक्त केले आहेत. ते म्हणाले कीं, भारत हा एक खंडप्राय देश असून त्यांत दारिद्र्य, रोगराई व निरक्षरता फार मोठ्या प्रमाणावर आहे. पश्चिमेकडील प्रगत देशांनीं भारताच्या ह्या वारशाविरुद्ध एकसारखी लढाई चालू ठेवली पाहिजे. पण ही लढाई फक्त भारताच्या भूमीवर चालणार आहे असें मात्र नाहीं. खुद्द अमेरिकेंत विलासप्रियता व स्वयंसंतुष्टता ह्यांचें जें साम्राज्य आहे त्याविरुद्धहि हत्यार उपसणें जरूरीचें आहे. लोकशाहीवर आधारलेले मार्ग स्वीकारून आर्थिक प्रगति साधण्याचे प्रयत्न भारत करीत आहे. ह्या प्रयत्नांत भारताला यश प्राप्त करून देण्यासाठी पाश्चिमात्त्य राष्ट्रांनींहि आस्था दाखविली पाहिजे. सध्यां भारत आर्थिक विकासाच्या आणीबाणीच्या काळांतून जात आहे. ह्याचवेळीं बाहेरील मदतीची त्याला अतिशय आवश्यकता आहे. १९६१ ते १९६६ च्या मुदतीसाठी भारतानें जो कार्यक्रम आंखला आहे. तो योग्य असा असून त्याची अंमलबजावणी होणें शक्य कोटींतील आहे. कार्यक्रम यशस्वी रीत्या पार पाडण्यासाठी भारताला परदेशीय चलनाच्या रूपांत ५५० कोटी डॉलर्स लागतील असा अंदाज करण्यांत आला आहे. ही मदत मिळाली तर भारताचीं प्रगतीचीं पावलें अधिक आत्मविश्वासपूर्वक व नेटानें पडतील ह्याविषयीं शंका घेण्याचें कारण नाहीं.

---

## मॅनेजिंग एजन्सीची मुदतवाढ

मॅनेजिंग एजन्सीची कमाल मुदत पांच वर्षांची आहे, ती योग्य अशा नव्या उपक्रमांचे बाबतींत वाढविण्याचें भारत सरकारनें ठरविलें आहे. प्रत्येक प्रकरणाचा विचार स्वतंत्रपणें केला जाईल. जागतिक बँक, इंटरनॅशनल फिनॅन्स कॉर्पोरेशन, इत्यादिसारख्या जागतिक आर्थिक संस्थांकडून ज्यांना मोठें साहाय्य झालेलें आहे, अशा कंपन्यांच्या मॅनेजिंग एजन्सीजना जास्त, १० वर्षांपर्यंत मुदत दिली जाईल. कंपनी कायद्याप्रमाणें, सर्व मॅनेजिंग एजंटांनीं येत्या १५ ऑगस्टपूर्वी आपल्या एजन्सीची मुदत नव्यानें पांच वर्षांची करून घ्यावयाची आहे. मॅनेजिंग एजंटांचें उत्पन्न कमी होत चाललें असलें तरी त्यांनीं १९५७–५८ मध्यें पब्लिक कंपन्यांच्या १०१ कोटी रुपये उत्पन्नापैकी १२ कोटी रुपये उत्पन्न मिळविलें होतें.

---

## रशियाच्या रूबलच्या किंमतींत दहापट वाढ

१९६१ पासून रशियांत सध्यांच्या दहा पट किंमतीचा रूबल सुरू करण्यांत येईल, असें मि. क्रुश्चेव्ह ह्यांनीं जाहीर केलें आहे. त्यामुळें सरकार किंवा जनता ह्यापैकी कुणाचेंच नुकसान होणार नाहीं. सर्व जिनसा दहापट महाग होतील पण सरकार लोकांना देत असलेलें वेतनहि दसपट केलें जाईल. नव्या रूबलमुळें रशियाच्या हिशेबपद्धतींत सुलभता येईल. चालू अधिकृत हुंडणावळीप्रमाणें १ ब्रिटिश पौंड म्हणजे ११·२ रूबल्स होतात.

---

## मद्रासमधील टॅक्सींत चार उतारू

मद्रास सरकारनें बेबी टॅक्सीमध्यें चार उतारू (ड्रायव्हर वगळून) घेण्यास परवानगी देण्याचें ठरविलें आहे.

## शेड्यूल्ड बँकांवर रिझर्व्ह बँकेचें नवें नियंत्रण

रिझर्व्ह बँकेनें ४ मे, १९६० रोजीं काढलेल्या प्रेस नोटचा सारांश खालीलप्रमाणें आहे :—

सध्यां प्रत्येक शेडयूल्ड बँकेला रिझर्व्ह बँकेकडे, स्वतःच्या 'डिमांड' देण्याच्या ५% व 'टाइम' देण्याच्या २½% एवढी रक्कम ठेव म्हणून ठेवावी लागते. शेडयूल्ड बँकांकडील ठेवींत ६ मेनंतर जेवढी वाढ होईल, तिच्या ५०% रक्कम रिझर्व्ह बँकेकडे ठेवावी लागेल. प्रत्येक बँकेला ठेवींवर द्यावें लागणारें व्याज लक्षांत घेऊन, तिच्या रिझर्व्ह बँकेंतील जादा ठेवीवर रिझर्व्ह बँक व्याज देईल.

११ मार्च, १९६० रोजीं प्रेस नोट काढून, शेडयूल्ड बँकांनीं जादा ठेवींपैकी २५% ठेवी रिझर्व्ह बँकेकडे ठेवाव्या, असा रिझर्व्ह बँकेनें हुकूम काढला होता. २५% चें प्रमाण आतां ५०% करण्यांत आलें आहे. पैशाच्या मागणीचा मोसम आतां संपत आला आहे; तेव्हां बँकांकडे जादा येणाऱ्या ठेवींचा विनियोग विशेष उत्पादक नसलेल्या व्यवहारांकडे त्यांचे हातून होण्याचा संभव आहे. त्यास आळा घालण्याचा रिझर्व्ह बँकेचा हेतु आहे.

---

## बँक ऑफ इंडियाचे जनरल मॅनेजर, श्री. लालवाणी यांचा हाँगकाँगमध्यें मृत्यु

बँक ऑफ इंडियाचे श्री. टी. आर. लालवाणी हे गेल्या आठवड्यांत हाँगकाँगमध्यें वयाच्या ६३ व्या वर्षी मृत्यु पावले. त्यांचा जन्म हैद्राबाद (सिंध) मध्यें झाला. मुंबई विद्यापीठाची बी. ए. परीक्षा पास झाल्यावर ते मुंबई येथें बँक ऑफ इंडियांत १९१७ मध्यें नोकरीस लागले. त्यांनीं सुरत, पुणें व कलकत्ता येथ एजंट म्हणून काम केलें. १९५४ मध्यें त्यांची बँकेचे डेप्युटि जनरल मॅनेजर म्हणून नेमणूक झाली. १९५७ मध्यें ते जनरल मॅनेजर झाले.

---

## महाराष्ट्राला १५५ आय. ए. एस. अधिकारी

महाराष्ट्राच्या वाट्याला १५५ व गुजरातच्या वाट्याला १०० आय. ए. एस. अधिकारी आले आहेत.

---

## महाराष्ट्राच्या विकासाची मानसिक बाजू

गुरुवार, दि. १२ रोजीं सायंकाळीं ६ वाजतां लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालयाच्या वासंतिक शास्त्रीय व्याख्यानमालेंत श्री. श्री. वा. काळे ह्यांचें "महाराष्ट्राच्या विकासाची मानसिक बाजू" ह्या विषयावर व्याख्यान होणार आहे.

---

## बेवारशी कुत्र्यांपासून परदेशी हुंडणावळ मिळविणार

कोरियाकडे बेवारशी कुत्रीं निर्गत करून परराष्ट्रीय हुंडणावळ मिळविण्याचा प्रयत्न पाकिस्तान सरकार करणार आहे. "डॉग सूप" कोरियांत अत्यंत लोकप्रिय आहे !

---

## भावनगर येथें काँग्रेसचें वार्षिक अधिवेशन

काँग्रेसचें येथें वार्षिक अधिवेशन सौराष्ट्रांत भावनगर येथें भरविलें जाईल.

---

## युनायटेड वेस्टर्न बँकेला लायसेन्स

दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा ह्या शेडयूल्ड बँकेस बँकिंग कंपन्यांच्या कायद्याच्या कलम २२ (१) प्रमाणें रिझर्व्ह बँकेनें लायसेन्स दिलें आहे. ह्याबद्दल आम्हीं बँकेचें मनःपूर्वक अभिनंदन करतों.

## भोर स्टेट बँकेची कर्जविषयक सावधगिरी

अध्यक्ष, श्री. म. त्र्यं. शिंगरे, ह्यांचे भाषणांतील उतारे

बँकेचा व्यवहार थोडक्यांत समजणें सुलभ व्हावें या हेतूनें सन १९५५ ते ५९ या पांच वर्षांखेरीचे कांहीं महत्त्वाचे आंकडे तुलनेसाठी आपलेपुढें मांडीत आहे.

| सन | एकूण ठेवी | कर्जे | नफा |
|---|---|---|---|
| १९५५ | १२,८०,९०० | ५,९०,९०० | ५,६१५ |
| १९५६ | १३,७६,७०० | ६,२६,८०० | ४,४५३ |
| १९५७ | १३,४६,९०० | ६,९३,३०० | ७,९०५ |
| १९५८ | १४,३१,८०० | ६,४६,९०० | ४,८३१ |
| १९५९ | १४,९३,०५३ | ७,६३,५४६ | ५,६२७ |

| सन | खेळतें भांडवल | व्याज दिलेले | व्याज मिळालेलें |
|---|---|---|---|
| १९५५ | १७,२७,२०० | २९,५५७ | ६५,३८९ |
| १९५६ | १७,७८,८०० | २९,९०१ | ६५,१२५ |
| १९५७ | १७,८०,५०० | ४२,५६९ | ८२,६५९ |
| १९५८ | १८,४६,००० | ४४,८२७ | ८२,१५४ |
| १९५९ | १९,२१,९४७ | ५०,९०४ | ८८,७१६ |

कर्जे मंजूर करतांना शक्यतों तारणी कर्जे मंजूर करणें व बिनतारणी कर्जें फक्त कॅशकेडिट खातेदारांनाच कीं ज्यांनीं त्यांचीं खातीं नियमाप्रमाणें मुदतींत पूर्ण केलीं त्यांना पूर्वीइतकीच दरवर्षी कॅशकेडिटस् मंजूर करण्याकडे संचालक मंडळाचें धोरण आहे. तसेंच बिनतारणी कर्जें नव्यानें मंजूर शक्यतों न करण्याचें कटाक्षानें ठरविलें आहे. कारण, बिनतारणी कर्जांचें प्रमाण आणिक कमी करावे असें रिझर्व बँकेनें सुचविलें. त्यामुळें एकूण कर्जांमध्यें तारणी कर्जांचें प्रमाण वाढत राहील.

बँकेचें खेळतें भांडवल सन १९५५ सालापासून हळू हळू वाढत आहे. गेल्या वर्षी ते रु. ७९,९०० नें वाढलेले दिसतें.

तारणी कर्जे व कॅशकेडिट ह्यांचें तुलनात्मक आंकडे पुढील प्रमाणें आहेत :—

| सन | एकूण कॅशकेडिट व कर्जे | पैकी तारणी कर्जे | शेंकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १९५५ | ५,९०,९०० | ३,८९,००० | ६५.८३ |
| १९५६ | ६,२६,८०० | ३,८१,००० | ६२.३८ |
| १९५७ | ६,९२,३०० | ४,६०,१४५ | ६७.४७ |
| १९५८ | ६,४६,९०० | ४,३६,००० | ६७.९२ |
| १९५९ | ७,६३,५४६ | ५,२१,५२७ | ६८.३० |

## अमेरिकेच्या देणगीचा दुरुपयोग

### भारतांतील काळा बाजार

अमेरिका कित्येक देशांना अन्नपदार्थ देणगीदाखल मोफत देते; त्या देशांपैकी किमान १८ देशांत तरी त्या पदार्थांचा उपयोग काळा बाजार करण्याकडे आणि इतर गैरवापर करण्याकडे केला जातो, असें अमेरिकन सरकारतर्फे जाहीर झालें आहे. ह्या १८ देशांत भारत आणि पाकिस्तान ह्यांचा समावेश आहे. भारतासंबंधीं असें मत व्यक्त करण्यांत आलें आहे :—" अपुरी देखरेख आणि हिशेबाची अपुरी व्यवस्था; काळाबाजार; देणगीच्या उगमाबद्दल माहिती प्रसिद्ध न करण्याचा कल. "

## साखरेच्या कारखान्यांतील उपपदार्थांचा उपयोग

बिहारमधील साखरेच्या धंद्याचे प्रतिनिधी आणि राज्य-सरकारच्या उद्योग व अबकारी खात्यांचे अधिकारी ह्यांची एक परिषद् पाटणा येथें भरविण्यांत आली होती. ह्या परिषदेंत भाषण करतांना बिहारचे उद्योगखात्याचे उपमंत्री श्री. साही ह्यांनीं कांहीं उपयुक्त सूचना केल्या आहेत. ते आपल्या भाषणांत म्हणाले कीं, साखरेच्या कारखान्यांतून उसाच्या रसावरील मळी आणि उसाचें चिपाड हे दोन उपपदार्थ उपलब्ध होतात. ह्या महत्त्वाच्या उपपदार्थांचा उपयोग करून देशाची अर्थव्यवस्था सुधारणें आणि रोजगाराचें नवें क्षेत्र निर्माण करता येणें शक्य आहे. बिहारमधील उत्तर भागांत लोकसंख्या फार आहे. अर्थात्‌च तेथील लोकांना रोजगाराची फार आवश्यकता आहे. तेथें मळीपासून पॉवर अल्कोहल तयार करण्याचे व चिपाडांपासून कागद तयार करण्याचे कारखाने काढण्यांत आले पाहिजेत. उसाची बागायत व साखरेचे कारखाने ह्यांना बिहारच्या अर्थव्यवस्थेंत महत्त्वाचें स्थान आहे. राज्यांतील २८ साखर कारखान्यांपैकीं २५ उत्तर बिहारमध्यें आहेत. ह्या कारखान्यांतून ६६ लाख मण मळी उपलब्ध होत असते. तिचा उपयोग करून घेतला, तर १० लाख गॅलन पॉवर अल्कोहल तयार होऊं शकेल. बिहारमधील साखर कारखानदारांनीं ह्या बाबतींत पुढाकार घेतला पाहिजे. भारताची औद्योगिक प्रगति जसजशी होत जाईल, तसतशी पॉवर अल्कोहलची मागणी वाढतच जाणार आहे. कागदाच्या उत्पादनाच्या व वापराच्या बाबतींतहि भारत अजून मागासलेला आहे. तेव्हां उसाच्या चिपाडांपासून कागद तयार करण्याच्या कारखान्यांनाहि चांगला वाव आहे.

## खाजगी उद्योगधंद्यांना खूप वाव आहे

अमेरिकेंतील व्यापारी व उद्योगधंदेवाल्यांचें सहा जणांचें एक मंडळ पश्चिम भारताचा दौरा करण्यासाठी कांहीं महिन्यांपूर्वी भारतांत आलें होतें. त्यांनीं आपल्या दौऱ्यांत ७०० भारतीय उद्योगपतींच्या व व्यापाऱ्यांच्या गांठीभेटी घेतल्या व त्यांच्याशीं विचारविनिमय केला. मंडळानें ह्या बाबतींत तयार केलेल्या अहवालांत असें म्हटलें आहे कीं, भारतामधील औद्योगीकरणांत खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांना अद्याप भरपूर वाव आहे. दहा वर्षांपूर्वी असा वाव आहे कीं नाहीं ह्याविषयीं शंका व्यक्त करणें योग्य झालें असतें. पण, आतां अशा शंकेला जागा नाहीं. आतां खाजगी उद्योगधंद्यामार्फत किती औद्योगीकरण करावें व तें किती लवकर करावें, एवढाच काय तो प्रश्न उरला आहे. भारताची आजची गरज म्हणजे भांडवली मालाचा पुरवठा. गेल्या कांहीं वर्षांत भारतामधील बाजारपेठ एकसारखी विस्तार पावत आहे. त्यामुळें खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांना जोराचे प्रयत्न करण्यास चांगला हुरूप आलेला आहे. माणसाच्या मूलभूत गरजा भागविण्यासाठी अधिक वेगानें काम करणें आवश्यक असल्याचें उद्योगपतींच्या ध्यानांत आलेलें आहे. भारतामधील धंदेवाल्यांत आढळून आलेल्या दोन प्रवृत्ति विशेष उत्साहजनक आहेत. उद्योगपतींभोंवतीं जीं बंधनें व मर्यादा आहेत त्यांची देशाच्या हिताच्या दृष्टीनें गरज आहे. ही गोष्ट त्यांना स्वतःलाच पटलेली आहे. ही पहिली प्रवृत्ति. शक्य त्या सर्व उपायांनीं आपलें ध्येय गाठण्यासाठी त्यांनीं चालविलेली अविश्रांत धडपड, ही दुसरी प्रवृत्ति. पण ही धडपड करतांना उद्योगधंद्याच्या बाबतींत सरकारनें घातलेलीं नियंत्रणें मानण्याकडे त्यांचा कल आहे.

## तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील सहकारी क्षेत्राचा विकास

राष्ट्रीय सहकार विकास व गुदाम मंडळाच्या पुणें येथें प्रा. द. गो. कर्वे ह्यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या बैठकींत कर्ज, विक्री, प्रक्रिया आणि सांठवण यासंबंधींच्या सहकारी क्षेत्राच्या विकासाच्या तिसऱ्या पंचवार्षिक योजनेची रूपरेषा देणाऱ्या मसुद्यावर विचारविनिमय करण्यांत आला आणि तो मसुदा मध्यवर्ती समाज विकास व सहकार खात्याकडे विचारासाठी पाठविण्याचा निर्णय घेण्यांत आला. सहकारी क्षेत्राच्या विकासाच्या या योजनेचा मसुदा सदर मंडळानें जून १९५९ मध्यें श्री. आर. जी. सरैय्या यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या उपसमितीनें तयार केला. या उपसमितीनें ६१·५० कोटी रुपये खर्चाच्या योजनांचीं प्रत्यक्ष लक्ष्यें कायम ठेवावींत याचीहि शिफारस केली आहे. मध्यवर्ती सरकारकडून थेट आर्थिक मदत मिळणाऱ्या योजनांचा त्यांत समावेश नाहीं. या योजनांनुसार पाहतां, ४५,५०० नव्या शेतकी पतपेढ्यांची स्थापना, ६२,४७५ जुन्या शेतकी पतपेढ्यांची पुनर्रचना आणि १४ पतसंघटनांची उभारणी अशीं लक्ष्यें संकल्पिलेलीं आहेत. यामुळें तिसऱ्या पंचवार्षिक योजनेअखेरीपर्यंत सहकारी संघटनांची सदस्यसंख्या सुमारें ४ कोटी होईल.

मध्यम व अल्प मुदतीचीं कर्जे देण्याकरितां ५०० कोटी रुपये आणि दीर्घ मुदतीचीं कर्जे देण्याकरितां ६५ कोटी रुपयां-वर रक्कम मंजूर करावी असें या उपसमितीनें सुचविलें आहे. त्याचप्रमाणें ६०० नव्या मार्केटिंग सोसायट्या काढाव्यात आणि ६२९ विद्यमान सोसायट्यांची पुनर्रचना करावी, अशीहि सूचना या उपसमितीनें केली आहे. २० सहकारी साखर कारखाने आणि ६०० प्रक्रिया करणारे कारखाने उभारावेत, ७,२०० ग्रामीण विभागांतील ५०० मोठ्या सोसायट्यांचीं गुदामें काढावींत आणि १,२०० मार्केटिंग सोसायट्यांचीं गुदामें मिळून ९,००० वर गुदामें बांधण्यांत यावींत अशीहि शिफारस करण्यांत आली आहे.

**सौराष्ट्रांत नवा रासायनिक कारखाना**—टाटा केमिकल कंपनीनें सौराष्ट्रांत मिठापूर ह्या ठिकाणीं एक नवा रासायनिक कारखाना स्थापन केला आहे. ह्या कारखान्यांत सोडा ॲश तयार करण्यासाठीं नवीन पद्धतीचा वापर करण्यांत येत आहे. त्यामुळें सोडा ॲशचें उत्पादन कमी खर्चात होऊ लागेल. कार-खान्यांत दररोज ३०० टन सोडा ॲश तयार होईल. कारखाना स्थानिक एंजिनिअर्सनीच उभारला.

**गुजरातमधील छोटे उद्योगधंदे**—नव्यानें स्थापन होणाऱ्या गुजरात राज्यांतील छोट्या उद्योगधंद्यांची पाहणी करण्यांत येणार आहे. पाहणी पूर्ण झाल्यावर पाहणींतील माहितीचा उपयोग करून छोट्या उद्योगधंद्यांचा विकास लवकर घडवून आणण्यासाठी एक योजना आंखण्यांत येणार आहे. गुजरातमध्यें सार्वजनिक मालकीचे उद्योगधंदे स्थापन करण्यासाठी मध्यवर्ती सरकारशीं विचारविनिमय करण्यांत येईल.

**मशिदींच्या व्यवस्थेसाठी मदत**—शिखांचे पुढारी मास्तर तारासिंग नुकतेंच पाकिस्तानांत जाऊन आले. पाकिस्तानांतील एका बिगर-सरकारी संघटनेनें हिंदूंच्या व शिखांच्या देवालयांची व धार्मिक क्षेत्रांची व्यवस्था नीट ठेवण्यासाठी प्रयत्न चालविलेले त्यांनीं पाहिले. मास्तर तारासिंग ह्यांनीं आपल्याजवळील धर्मादाय फंडांतून १,००० रुपये मशिदींच्या व्यवस्थेसाठी दिले आहेत.


# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

— शाखा —

(१) पुणें लष्कर (२) बारामती (३) लोणावळा (४) श्रीरामपूर (५) ओझर (जि. नाशिक) (६) खोपोली (जि. कुलाबा).

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,१९५ |
| रिझर्व्हज् | रु. १,३८,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ८५,००,०००चे वर |

★रिकरिंग डिपॉझिट्स स्वीकारलीं जातात.
★शॉर्ट टर्म्स व कॉल डिपॉझिट्स स्वीकारलीं जातात.
★मुख्य कचेरींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्स मिळतात.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

रा. बा. साळवेकर
B. A., LL. B.
मॅनेजर

# भोर स्टेट बँक लि.

(स्थापना १९४४)

मुख्य कचेरी :—भोर, जि. पुणें.
शाखा :—पुणें, पाली व शिरवळ

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | ... | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | ... | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | ... | रु. ९१,००० |

*मुख्य कचेरींत भाड्यानें डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.*

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याज वसुली, पेन्शन कलेक्शन व बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात. बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी :— बुधवार घ. नं. ३६१-६२ पासोड्या विठोबा नजिक. फोन नं. २५७६.

—अधिक माहितीसाठी लिहा—

(—बोर्ड ऑफ डायरेक्टर्स—)

| | |
|---|---|
| श्री. म. त्र्यं. शिंगरे | न. भू. ना. पां. थोपटे |
| अध्यक्ष | उपाध्यक्ष |
| रावसाहेब य. द. खोले | श्री. चं. रा. राठी |
| श्री. गो. बा. देवी | श्री. वा. ग. धंदुके |

## भारत–पाकिस्तान व्यापारांतील घट

भारत आणि पाकिस्तान ह्यांचेमधील व्यापार कमी–कमी होत चालला आहे. १९४८ मध्यें भारतानें पाकिस्तानाकडून १०० कोटि रुपयांचा माल घेतला आणि त्याच्याकडे ७० कोटि रुपयांच्या मालाची निर्गत केली. त्यानंतर ह्या व्यापारास ओहोटी लागली. इतर देशांशीं व्यापार करण्याचा पाकिस्तानचा दुराग्रह, स्थानिक उत्पादनांत वाढ, परराष्ट्रीय हुंडणावळीची कमतरता, हींहि त्याला कारणीभूत आहेत. अमेरिकेच्या आर्थिक साहाय्याच्या कार्यक्रमामुळें जपान, हाँगकाँग, इत्यादीं-कडून पाकिस्तान कपास, कापड व सूत आयात करूं शकला. पाकिस्तान भारताकडून कोळसा, मसाल्याचे पदार्थ, रसायनें, औषधें, यंत्रसामग्री, कापड, इत्यादि माल घेतो आणि भारत पाकिस्तानकडून कपास, मासे, इत्यादींची आयात करतो. दिल्ली येथें कांहीं आठवड्यांपूर्वी दोन्ही देशांतील एका व्यापारी करारावर सह्या झाल्या. त्या करारांत आयात–निर्गतीचा तपशील दिलेला आहे. पण सरहद्दीवरील व्यापाराविषयीं एकमत झालेलें नाहीं.

भारताचा पाकिस्तानशीं व्यापार

| | निर्गत (लक्ष रु.) | आयात (लक्ष रु.) | तफावत (लक्ष रु.) |
|---|---|---|---|
| १९५२ | ४६,३४ | २९,१४ | +१७,२० |
| १९५३ | ७,६२ | १९४१ | –११,७९ |
| १९५४ | १०,०९ | १७,८२ | – ७,७३ |
| १९५५ | ८,७१ | २५,०८ | –१६,३७ |
| १९५६ | ८,०८ | २०,९१ | –१२,८३ |
| १९५७ | ६,७७ | १३,४० | – ६,६३ |
| १९५८ | ७,१६ | ६,२७ | + ८९ |
| १९५९ | ४,९२ | ४,१७ | + ७५ |

( जाने.–ऑक्टो. )

## वाढती विमान वहातूक

एअर इंडिया इंटरनॅशनलनें १९५९ मधील पहिल्या सहामाहीं-तल्यापेक्षा दुसऱ्या सहामाहींत अधिक किलोमीटर संचार करून अधिक प्रवासी व मालवाहतूक केली.

भारतांतील नागरी विमान वाहतुकीच्या या मुदतींत झालेल्या प्रगतीच्या पुनर्विलोकनांत असें दिसून आलें कीं, या संघटनेनें आपल्या नित्याच्या मार्गावर ६०,९३,५२९ किलोमीटर संचार करून ४७,१९३ प्रवासी, १४,५८,५९९ किलोग्रॅम माल आणि ४,३५,८०९ किलोग्रॅम टपाल यांची वाहतूक केली.

याच मुदतींत इंडियन एअरलाइन्स कॉर्पोरेशननें आपल्या नित्याच्या मार्गावर १,३६,३५,११५ किलोमीटर भ्रमण करून १,१६,९७९ प्रवासी, १,४९,९१,७६१ किलोग्रॅम माल व २९,८६,७०४ किलोग्रॅम टपाल यांची वाहतूक केली. या कॉर्पोरेशननें १ डिसेंबर १९५९ पासून देशांतील हवाई वाहतुकीचें स्वरूप बदललें आहे.

डिसेंबर १९५९ अखेरीस नागरी विमान वाहतूक खात्याच्या नियंत्रणाखाली व देखभालीसाठी ८५ विमानतळ होते. १९५९ च्या दुसऱ्या सहामाहींत हातीं घेतलेल्या विविध कामांत औरंगा-बाद विमानतळावरील धांवमार्गाची बळकटी करणें, सांताक्रूझ (मुंबई) विमानतळापाशीं नोकरवर्गाकरितां राहण्यास खोल्या बांधणें, दिल्ली (पालम) विमानतळावर जेट विमानास योग्य असा नवा धांवमार्ग बांधणें, या कामांचा अंतर्भाव होता.

५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान
सरदारगृह
प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी
लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था
सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

अन्नाचें रहस्य


बेडेकर मसाले, लोणचीं, पापड
ह्या वस्तूंनीं आपल्या जेवणांत गोडी वाढते व समाधान वाटतें.
व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि.
दुकानें—गुगभाट, ठाकुरद्वार, दादर, कोट, परळ
— द. ना. हेजीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें —




माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.

नेहमींच प्रगतिपर व सुरक्षित

# दि बेळगांव बँक लिमिटेड

## बेळगांव

( शेड्यूल्ड बँक )

स्थापना १९३०

★ नियमित बचत केल्यानें कुटुंबाची व राष्ट्राची शक्ति वाढीस लागते.

★ कुटुंबांतील मंगलकार्ये, उच्चशिक्षण किंवा घरबांधणी हीं मोठ्या खर्चाचीं कामें पार पाडण्यासाठी नियमित बचत करणें अगत्याचें ठरतें.

★ बेळगांव बँकेंत क्युम्युलेटिव्ह डिपॉझिटचें वा होम-सेव्हिंग्जचें खातें उघडून आपणांस ही तरतूद योग्य रीतीनें करतां येते.

व्याजाचे आकर्षक दर.

आपल्या सव्वीस शाखांतून सेवावृत्तीनें व्यापार व बचत यांची नेहमींच वाढ करीत असलेली

**दि बेळगांव बँक लिमिटेड.**

एच्. एस्. कुलकर्णी
जनरल मॅनेजर

स्थापना १९३६

# दि युनायटेड वेस्टर्न बँक लि. सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस :

पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा शहर.

शाखा—१. मुंबई, फोर्ट, २. मुंबई, गिरगांव, ३ मुंबई, दादर, ४. नासिक, ५. पुणें, ६. बार्शी, ७. लोणंद, ८. कोल्हापूर, ९. हलकर्णी, १०. इचलकरंजी, ११. फलटण, १२. अकलूज.

| | | ३१ डिसेंबर, १९५९ |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | ४,७१,००० |
| ठेवी | रु. | १,८८,९२,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | २,१७,२५,००० |

मुदत ठेवीवरील व्याज :

| १ वर्ष ते २ वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें | दहा वर्षें |
|---|---|---|---|
| रु. ३·०० | रु. ३·२५ | रु. ३·५० | रु. ४·०० |

रु. एक हजार अगर त्याहून अधिक रकमा अल्प मुदतीनें आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात.

दराबाबत चौकशी करावी.

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | २·०० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | दरसाल दर शेंकडा | २·५० |
| चालू डिपॉझिट | दरसाल दर शेंकडा | ०·५० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., जन. मॅनेजर.
शं. ह. साठे, बी. ए., एलएल्. बी., चेअरमन

# बँक ऑफ पूना, लिमिटेड

( शेड्यूल्ड बँक )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. ५०,००.००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | | रु. २५,००,००० |
| वसूल भांडवल | ... | रु. १२,५०,००० |

—: संचालक मंडळ :—

१. श्री· दत्तात्रय रामचंद्र नाईक, चेअरमन
२. डॉ· ना· भि· परुळेकर, व्हाईस चेअरमन (संचालक, सकाळ)
३. श्री· फ्रामजी पी· पोचा
४. श्री· गणपतराव काळुराम नाईक, B. Sc., B. E., LL. B.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

अल्प मुदत ठेवीवर आकर्षक व्याज.

...शाखा...

**पुणें (१) सदाशिव पेठ, (२) डेक्कन जिमखाना (३) सांगली.**

हेड ऑफिस व सांगली शाखेंत अल्प भाड्यांत लॉकरची सोय.

मुख्य ऑफिस : ३५९ रविवार पेठ, पुणें

गो. गं. साठे
मॅनेजर

# दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई–१.

( स्थापना : १९११ )

चेअरमन : श्री· रमणलाल जी· सरैय्या, ओ· बी· ई·

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका हिंदी शेतकरी व सहकारी संस्था ह्यांना साहाय्यकारक होतो.

भरपाई झालेलें भाग भांडवल :

| | |
|---|---|
| भागीदारांतर्फे | रु. ४४ लक्ष |
| मुंबई सरकारतर्फे | रु. ८१ लक्ष |
| | रु. १ कोटी, २५ लक्ष |

| | |
|---|---|
| गंगाजळी व इतर फंड : | रु. ५२ लक्ष |
| एकूण ठेवी : | रु. १२ कोटी |
| खेळतें भांडवल : | रु. २४ कोटींचे वर |

**१० जिल्ह्यांमध्यें व मुंबई उपनगरांत मिळून ४२ शाखा**

भारतांतील सर्व प्रमुख शहरीं कलेक्शनची व्यवस्था. सर्व तऱ्हेचीं बँकिंगचीं कामें केलीं जातात· सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात· शर्तीबद्दल चौकशी करावी·

जी. एम्. लाड
मॅनेजिंग डायरेक्टर.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.